RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ७१

दि.०७ जुलै २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


# उपवर्गीकरणाच्या आडून आरक्षण, संविधान संपविण्याचे मनुवादी कारस्थान: रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर










**विशेष प्रतिनिधी**

**लातूर:** या देशातल्या मनुवादी व्यवस्थेने बहुजन समाजाला अडीच हजार वर्षांपासून गुलामीत ठेवत अमानुष जीवन लादले,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी याविरोधात अतिशय शांतीच्या मार्गाने संविधानाची क्रांती करुन त्यांना अस्मान दाखविले,तीच प्रवृत्ती आता पुन्हा अनुसूचीत जातीचे आरक्षण उपवर्गीकरणाच्या माध्यमातून आरक्षण आणि पुढे संविधान संपवून, तुमच्या नोकरीच्या संधी आणि पुढे गेलेल्या समाजाला खाली खेचण्याचे कुटील कारस्थान करत आहे,असा घणाघात करुन,त्याविरोधात सर्व आरक्षणधारकांनी एकजुटीने उभे ठाकणे काळाची गरज असून,हे आव्हान आपण ताकदीने पेलू या, असे आवाहन रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांनी येथील विशाल जनसमुदायाला केले.

आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्यावतीने आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते जुने जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत विशाल मोर्चा काढण्यात आला.मोर्चाचे अरुण गवळी चौकात जाहीर सभेत रुपांतर झाले,त्यावेळी आनंदराज आंबेडकर बोलत होते.

मंचावर राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप,युवा नेते अमन आंबेडकर,भंते पय्यानंद थेरो, रिलस्टार रुक्मीणी लोंढे,ढोर समाजाचे अध्यक्ष श्रीमंत कावळे, सत्यशोधक समाज महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मण शिंदे, माजी उपनगराध्यक्ष मोहनराव माने, ज्येष्ठ नेते बसवंतअप्पा उबाळे, ॲड.बाबासाहेब गायकवाड, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे,भीम टायगर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दादासाहेब शेळके, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रोहिदास वाघमारे, हिंदू खाटिक समाज,संतुजी लाड ब्रिगेडचे ॲड.प्रदीपसिंग गंगणे, संभाजी ब्रिगेडचे ॲड. गोविंद सिरसाट,रिपाइं नेते हरिष डावरे, युवा नेते राजू ताटे, व्ही एस पँथर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोदभाऊ खटके, ब्ल्यू पँथर संघटनेचे साधू गायकवाड, रिपब्लिकन सेनेचे प्रा.युवराज धसवाडीकर, युवा नेते आशिष वाकोडे, ॲड.अतिश चिकटे,वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष इंजि.सचिन गायकवाड, अशोक कांबळे, युवा भीम सेनेचे पंकज काटे, नगरसेवक ॲड.मनोज थोरात, पिरिपाचे एन.डी.सोनकांबळे, रिपाइं नेते चंद्रकांत चिकटे, कवठेकर,डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी आदींची उपस्थिती होती.

उपवर्गीकरणाच्या कारस्थानाचा आढावा देवून,उपवर्गीकरणाचा अधिकार संसदेला आहे,सर्वोच्च न्यायालयानेही उपवर्गीकरण केलेचे पाहिजे असे सांगितलेले नाही,असे सांगून आनंदराज आंबेडकर पुढे म्हणाले या देशात सत्ताधारी भाजपाने सत्ता हातात आल्यावर या देशात अगोदर ख्रिश्चन,मुस्लिमांविरोधात हिंदूंना उठवले.महाराष्ट्रात मराठा-ओबीसी,मग धनगर -आदिवासी असे वाद लावले आता उपवर्गीरकरणाच्या आडून बौध्द-मातंगामध्ये भांडणे लावण्याचे षडयंत्र करत आहेत,यामागे आरएसएस आहे. त्यांना राज्य करण्यासाठी आमच्यात वाद लावले जात आहेत. मातंग समाजावर यांचं खुप प्रेम आहे असं नाही हे मातंगांनी लक्षात घ्यावं,कारण त्यांनी या देशातील अनेक पक्षांची मोडतोड करुन त्यांना वाताहत केली आहे, त्यांच्या नादाला लागलेले तुमचं कधी काय करतील हे सांगता येत नाही,बाबासाहेबांनी आपल्याला सन्मान,आरक्षणाच्या माध्यमातून सर्वकाही दिलेले आहे,पण त्यांच्यावर तुम्ही टिका करताय पणे योग्य नाही ते सूर्य आहेत.आपली लढाई या देशात अडीच हजार वर्षांपासून चालत असलेल्या मनुवादाविरोधात आहे,या देशातले सर्व वाद आता वाद संपले आहेत,केवळ मनुवाद विरुध आंबेडकर वाद ही लढाई आहे. हे लक्षात घ्या.उपवर्गीकरणाच्या आडून तुम्ही जागे आहात की नाही हे चाचपणी केली जात आहे, ख्रिश्चन,मुस्लिम समाज आज हलबल आहे, तो आंबेडकरी नेतृत्व केव्हा पुढे येईल याची वाट पाहात,आहे या कळीच्या वेळी तुम्ही आरक्षण धारकांनो आपसात भांडू नका, या राज्यातले दोन कोटी आरक्षणधारक एकत्र आले तर राज्यातील सत्ता हातात घ्यायला वेळ लागणार नाही. पुढील काळी वर्षात देशाचे चित्र बदलणार आहे,त्यासाठी आपल्याला संघटीतपणे उभे राहावे लागेल,असा सूचक इशाराही त्यांनी शेवटी दिला.

माजी मंत्री बबनराव घोलप यांनी राष्ट्रीय चर्मकार समाजाच्या २८ उप जाती उपवर्गीकरणाच्या विरोधात आहेत, आजच्या महामोर्चाने एकीची सुरुवात झाली आहे. अशीच एकी पुढे करुन उपवर्गीकरणाचा लढा यशस्वी करुन या असा आशावाद व्यक्त केला.

भंते पय्यानंद थेरो यांनी या राज्याचे मुख्यमंत्री फडणवीय यांनी उपवर्गीरणाच्या माध्यमातून राजशिष्टाचार विसरलेला दिसतोय, त्यांची भूमिका संशयास्पद दिसतेय,उपवर्गीकरणाचा अहवालच जाहीर नाही तर त्यावर घेतलेल्या ऑनलाईन हरकती बेकायदेशीर असून,त्यांनी जाती जातीत भांडणे न लावता होशमध्ये यावे असा सल्ला दिला.

मोहनराव माने यांनी आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वात आपण सर्वांनी काम करावे अशी सूचना केली.चंद्रकांत चिकटे यांनी २०१४ पासून मनुवादाने डोकेवर काढले आहे, त्याविरोधात आंबेडकरवाद खंबीरपणे उभा राहिल असे सांगितले. तर बसवंतअप्पा उबाळे यांनी मनुवादाला आंबेडकर वाद हा एकमेव पयार्य असल्याचे सांगितले. रोहिदास बनसोडे म्हणाले की, उपवर्गीकरणाचा अहवालच जाहीर नाही तर कसलं उपवर्गीकरण,मातंग समाजाने मुक्ता सावळेंचा निबंध विसरला काय, जाती जातीत भांडणे लावण्याचे कारस्थान आणि बौध्द समाजाला एकाकी पाडण्याचे प्रयत्न हाणून पाडू असा इशारा दिला.ॲड. प्रदीपसिंह गंगणे यांनी बाबासाहेब झाले नसते तर तमाम वंचितांना न्याय मिळाला नसला,त्यांचे उपकार कोणालाही विसरता येणार नाहीत,असे नमुद केले.विनोद खटके



यांनी आमचा लढा कोणा जातीच्या नव्हे तर शासनाच्या विरोधात असून,कोणीही बाबासाहेब आाणि राजगृहावर केलेली टिका सहन केली जाणार नाही असे असा इशारा दिला.

याप्रसंगी रक्मीणी लोंढे, ॲड.रमक जोगदंड, प्रा.युवराज धसवाडीकर, ॲड. आतिश चिकटे, साधू गायकवाड, पंकज काटे, राजू ताटे, अशोक कांबळे, हरिष कांबळे यांचीही उपवर्गीकरणाला विरोध आणि आनंदराज आंबेडकर यांनी उभालेल्या लढ्याला पाठिंबा देत शासनाच्या कार्यपध्दतीवर टिकेची झोड उठवली.

दुपारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन या महामोर्चाला उत्साहात प्रारंभ झाला. आनंदराज आंबेडकर,माजी मंत्री बबनराव घोलप हे उघड्या रथावरुन मोर्चेकऱ्यांना प्रोत्साहन देत होते. मोर्चकरी हातात मागण्याचे फलक,निळे,पंचरंगी ध्वज उंचावत, उपवर्गीकरण रद्द करा,या सरकारचे करायचे काय,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो,भारतीय संविधानाचा विजय असो अशा घोषणा देत जात होते. या महामोर्चामध्ये दशकानंतर जिल्ह्यातील महिला,वृध्द, तरुणमुले, सर्वच स्थरातील आरक्षणधारक वर्ग,प्राध्यापक,शिक्षक,कर्म चारी,डॉक्टर,इंजिनिअर,सामाजिक कार्यकर्ते सामील झाल्याचे दिसत होते. मोर्चेकऱ्यांनी रस्त्यावरील महापुरुषांच्या पुतळ्यांना हात जोडून अभिवादन केले. तब्बल सहा तास चाललेला हा महामोर्चा अरुण गवळी चौकात पोहोचल्यानंतर उभालेल्या विशाल मंचावरुन मान्यवरांची समयोचित भाषणे झाली.

तत्पूर्वी समता सैनिल दलाच्यावतीने सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांना सलामी देण्यात आली तसेच मोर्चकऱ्यांच्यवतीने ५० हजार रुपयांचा लढा निधी सुपुर्द केला.मोच्यादरम्यान मुख्य रत्यावरील वाहतूक अन्यत्र वळविण्यात आली होती..मोर्चे कऱ्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती,प्रधानमंत्री,राज्याचे मुख्यमंत्री यांना मागण्याचे निवेदन सादर केले.शेकडो तरुणांनी या महामोर्चासाठी परिश्रम घेतले.

## मुसळधार पावसाने पुणे विमानतळावरील उड्डाणे विस्कळीत!

**पुणे/प्रतिनिधी:** गेल्या काही तासांपासून सतत कोसळत असलेल्या मुसळधार पावसाम ुळे पुणे विमानतळावरील उड्डाणे विस्कळीत झाली असून, दोन विमानांच्या वेळेत बदल करण्यात आले, तर काही विमान उड्डाणांना उशीर झाल्याची माहिती विमानतळ प्रशासनाकडून देण्यात आली.

सोमवारी (६ जुलै) सकाळपासूनच ढगाळ वातावरण आणि दृश्यमानता कमी असल्याने अनेक विमानांच्या येण्याच्या आणि उड्डाणाच्या वेळेत बदल करण्यात आले. आता दुपारपासून हवामानात सुधारणा झाली असून, परिस्थिती पूर्ववत होत असल्याचेही विमानतळ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. मुसळधार पावसामुळे देशांतर्गत प्रवास करणाऱ्या दोन विमानांना म ार्ग बदलावा लागला. 'इंडिगो एअरलाइन्स'चे चेन्नईहून पुण्याला (६ई-५०२) येणारे विम ान उशिरा दाखल झाले. तर, 'इंडिगो'चेच कोलकात्याहून पुण्याला येणारे (६ई-१३५) विमान विलंबाने धावत आहे. हे विमान कोलकाताहून निघाल्यानंतर हवामानामुळे हैदराबाद येथे थांबवण्यात आले होते. सध्या या विमानाने हैदराबादहून पुण्याकडे उड्डाण घेतले असून, सायंकाळी पाच वाजेपर्यंत पुणे विमानतळावर दाखल होण्याची शक्यता आहे. या विमानातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना तीन ते चार तासांचा उशीर होणार आहे. 'आकासा एअर'चे देशांतर्गत उड्डाण करणारे एक विमान कार्यप्रणाली निगडित कारणांमुळे रद्द करण्यात आले. याबाबत प्रवाशांना आगाऊ माहिती देऊन, पर्यायी व्यवस्था करण्यात आल्याची माहिती कंपनीकडून देण्यात आली आहे.

## IAS आयुक्त असावा तर असा! राहुल कुलकर्णी यांची पहिली सही सफाई कर्मचाऱ्यांच्या पगारावर; आता महसूल वसुलीवर भर देण्याची अपेक्षा

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहर महानगरपालिकेचे IAS नूतन आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी पदभार स्वीकारताच घेतलेला पहिलाच निर्णय सफाई कर्मचाऱ्यांच्या हिताचा ठरला. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या फाईलवर पहिली सही करून त्यांनी कर्मचारी वर्गाला मोठा दिलासा दिला. त्यामुळे महापालिका कर्मचाऱ्यांत समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



प द भा र स्वीकारल्यानंतर IAS अधिकारी राहुल कुलकर्णी यांनी शहरातील पाणीपुरवठा आणि स्वच्छता व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. संबंधित विभागांची प्रत्यक्ष पाहणी करून अधिकारी व कर्मचाऱ्यांना कामकाजात सुधारणा करण्यासाठी तातडीने उपाययोजना राबविण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.

दरम्यान, माजी आयुक्त मानसी मीना यांच्या कार्यकाळात सफाई कर्मचाऱ्यांच्या थकीत पगाराचा प्रश्न प्रलंबित राहिल्याबाबत कर्मचारी वर्गात नाराजी व्यक्त होत आहे. सफाई विभागाच्या अर्थसंकल्पात पगारासाठी निधी उपलब्ध असल्याचा दावा केला जात असतानाही वेतन रखडल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

मात्र, IAS अधिकारी राहुल कुलकर्णी यांच्यासमोर आता आणखी मोठे आव्हान आहे. महापालिकेची आर्थिक घडी मजबूत करण्यासाठी महसूल वसुलीवर कठोर भर देणे अत्यावश्यक मानले जात आहे. मालमत्ता कर, पाणीपट्टी, व्यापारी परवाने, भाडे आणि इतर थकीत महसुलाची प्रभावी वसुली झाल्यास महापालिकेच्या उत्पन्नात मोठी वाढ होऊ शकते. त्यामुळे विकासकामांना गती मिळेल, कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर देता येईल आणि नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील.

सफाई कर्मचाऱ्यांच्या पगाराला प्राधान्य देऊन सकारात्मक संदेश देणारे IAS आयुक्त राहुल कुलकर्णी आता महसूल वसुलीवरही तितक्याच कठोरपणे लक्ष केंद्रित करतील, अशी अपेक्षा नागरिक, कर्मचारी आणि करदाते व्यक्त करत आहेत. महापालिकेचे उत्पन्न वाढवून आर्थिक शिस्त प्रस्थापित करण्यात यश मिळाल्यास लातूर शहराच्या विकासाला नवी गती मिळू शकते.

## अतिवृष्टीमुळे घडलेल्या घटनांची चौकशी होणार; नागरिकांनी सतर्क राहावे-मंत्री गिरीष महाजन

**मुंबई/प्रतिनिधी** :राज्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे विविध ठिकाणी दरडी कोसळणे, झाडे पडणे आणि इमारतींचे नुकसान अशा घटना घडत असून, अशा सर्व घटनांची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत,नागरिकांनी सतर्क रहावे व अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीष महाजन यांनी विधान परिषदेत सांगितले.

मंत्री महाजन म्हणाले की, अतिवृष्टीमुळे दरडी कोसळणे ही नैसर्गिक आपत्ती असून, ज्या ठिकाणी बोगदे, रस्ते किंवा इतर ठिकाणी दरडी कोसळल्या आहेत, त्या सर्व घटनांची चौकशी केली जाईल. राज्यभरात; तसेच मुंबई महानगरपालिकेकडून आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. झाडांच्या छाटणीसह धोकादायक ठिकाणांवर मनुष्यबळ तैनात करण्यात आले असून, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य यंत्रणा सतर्क आहे. राज्यात काही भागांत विक्रमी पाऊस झाला असून, विशेषतः मुंबई, रायगड आणि कोकण पट्ट्यात अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. गेल्या तीन-चार दिवसांत राज्यात १३ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामध्ये



मानखुर्दमधील दुर्घटनेतील सहा मृत्यूंचा समावेश आहे, असे त्यांनी सांगितले.

मानखुर्द येथील दुर्घटनेनंतर आपण तातडीने घटनास्थळी भेट दिली होती. तेथील परिस्थिती अत्यंत गंभीर होती. वर्षानुवर्षे धोकादायक अवस्थेत असलेल्या परिसरात नागरिक वास्तव्यास असल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. धोकादायक इमारती खाली करण्यासाठी नोटिसा दिल्यानंतरही पर्यायी निवासाचा प्रश्न निर्माण होत असल्याने अनेक नागरिक स्थलांतरास तयार होत नाहीत. त्यामुळे अशा दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांनी परस्पर सहकार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, खाजगी कार्यालयांनी शक्य असल्यास वर्क फॉर्म होमचा अवलंब करावा आणि परिस्थितीनुसार शाळा-महाविद्यालयांना सुट्टी देण्याचे निर्णय घेण्यात आले आहेत. गेल्या दोन-तीन दिवसांत अतिवृष्टीमुळे घडलेल्या घटनाबाबत उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सविस्तर निवेदन करतील, असेही मंत्री महाजन यांनी स्पष्ट केले.

अतिवृष्टीने सर्व जणांनी सतर्क राहून शासनाला मदत करावी. राज्यातील अतिवृष्टीची परिस्थिती पाहता आजचे कामकाज स्थगित करत आहोत, असे विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले.

## संपादकीय...

### कृत्रिम बुद्धिमत्तेवर प्रभुत्व मिळवणारे देशच उद्याच्या जगाचे नेतृत्व करतील

एका कंपनीचे बाजारमूल्य जगातील बहुतांश देशांच्या अर्थव्यवस्थेपेक्षा मोठे असू शकते, यावर काही वर्षांपूर्वी विश्र्वास बसला नसता ; पण कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील आघाडीची कंपनी एनव्हिडियाने नुकताच पाच ट्रिलियन डॉलरचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. अमेरिका आणि चीन वगळता जर्मनी, जपान, भारत, ब्रिटन, फ्रान्स अशा जवळपास सर्व देशांच्या वार्षिक जीडीपीपेक्षा या एका कंपनीचे बाजारमूल्य अधिक आहे. अर्थात, कंपनीचे बाजारमूल्य आणि देशाचा जीडीपी यांची थेट तुलना करता येत नाही, तरीही या आकड्यामुळे एनव्हिडियाने जागतिक अर्थव्यवस्थेत मिळवलेले स्थान स्पष्ट होते.हा विक्रम केवळ वॉल स्ट्रीटवरील उत्सव नाही. तो जागतिक आर्थिक आणि राजकीय सत्तेच्या बदलत्या केंद्रांचा संकेत आहे. एकेकाळी तेलसंपत्तीवर जगाची सत्ता अवलंबून होती. आज तीच भूमिका संगणकीय चिप्स आणि 'कम्प्युटिंग पॉवर'ने घेतली आहे. एनव्हिडियाचे यश केवळ शक्तिशाली चिप्स बनवण्यात नाही. कंपनीची खरी ताकद तिच्या संपूर्ण तंत्रज्ञान परिसंस्थेत आहे. एआय विकसित करणाऱ्या लाखो संशोधक, स्टार्टअप्स आणि बहुराष्ट्रीय कंपन्या तिच्या हार्डवेअरबरोबरच 'क्युडा' या सॉफ्टवेअर प्लॅटफॉर्मवर अवलंबून आहेत. त्यामुळे एआयच्या जगात प्रवेश करायचा असेल, तर एनव्हिडियाला वळसा घालणे आज जवळपास अशक्य आहे. भविष्यातील डिजिटल महामार्गावर जणू या कंपनीने टोल नाकाच उभारला आहे.या कहाणीचा दुसरा भाग अधिक महत्त्वाचा आहे. एनव्हिडिया चिप्सची रचना अमेरिकेत होते ; मात्र त्यांचे उत्पादन मुख्यतः तैवानमध्ये होते. त्यामुळे तैवानभोवती निर्माण होणारा कोणताही तणाव जागतिक तंत्रज्ञान उद्योगाला हादरा देऊ शकतो. त्यातच अमेरिकेने चीनला अत्याधुनिक एआय चिप्सच्या निर्यातीवर घातलेले निर्बंध दाखवून देतात की, सिलिकॉन हा आता केवळ व्यापाराचा विषय राहिलेला नाही. तो राष्ट्रीय सुरक्षा आणि जागतिक सत्ता संतुलनाचा महत्त्वाचा घटक बनला आहे. या पार्श्र्वभूमीवर भारतानेही योग्य दिशेने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. सेमीकंडक्टर उत्पादनासाठी विशेष प्रोत्साहन योजना, गुजरातसह विविध राज्यांमध्ये उभारले जाणारे चिप प्रकल्प आणि 'इंडिया एआय मिशन'अंतर्गत उभारली जात असलेली उच्च क्षमतेची जीपीयू संगणकीय सुविधा ही त्याची उदाहरणे आहेत. भारतीय संशोधक, स्टार्टअप्स आणि उद्योगांना जागतिक स्पर्धे साठी आवश्यक संगणकीय पायाभूत सुविधा देशातच उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न आहे. तथापि, भारताची खरी संधी केवळ चिप उत्पादनात नाही. चिप डिझाईन, एआय डेटा सेंटर्स, क्लाऊड इन्फ्रास्ट्रक्चर, ऊर्जा कार्यक्षम संगणकीय व्यवस्था आणि भारतीय भाषांमध्ये विकसित होणाऱ्या 'सॉव्हरिन एआय'मध्ये भारत जागतिक नेतृत्व मिळवू शकतो. कारण, भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता केवळ तंत्रज्ञानाचा विषय राहणार नाही. ती आर्थिक वाढ, राष्ट्रीय सुरक्षा आणि जागतिक प्रभाव यांचे नवे मापदंड ठरणार आहे. एनव्हिडियाचा पाच ट्रिलियन डॉलरचा टप्पा हा एका कंपनीच्या यशाचा उत्सव नाही. तो जगातील संपत्ती, तंत्रज्ञान आणि सत्ता यांची व्याख्या वेगाने बदलत असल्याचा इशारा आहे. या नव्या युगात केवळ चिप्स बनवणारेच नव्हे, तर संगणकीय क्षमता आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर प्रभुत्व मिळवणारे देशच उद्याच्या जगाचे नेतृत्व करतील. भारताला त्या शर्यतीत आघाडी घेण्याची तयारी आजपासूनच आणि युद्धपातळीवर करावी लागणार आहे.

# नांदेड-मुंबई व टनकपूर-नांदेड दरम्यान दोन नवीन एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा

## टनकपूर पिलीभीत रेल्वे सेवेचा शाहजहानपूरपर्यंत विस्तार





**नांदेड/प्रतिनिधी :** केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे नांदेडमुंबई व टनकपूरनांदेड या दोन नवीन एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. तसेच टनकपूरपिलीभीत रेल्वे सेवेचा शाहजहानपूरपर्यंत विस्तारही करण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे उपस्थितांना संबोधित केले.

या निमित्ताने नांदेड, टनकपूर आणि पिलीभीत रेल्वे स्थानकांवर विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. टनकपूर येथे केंद्रीय राज्यमंत्री रवनीत सिंह, अजय टम्टा तसेच इतर लोकप्रतिनिधी उपस्थित होते. पिलीभीत येथे केंद्रीय राज्यमंत्री जितीन प्रसाद व इतर मान्यवर उपस्थित होते. त्याचवेळी नांदेड रेल्वे स्थानकावर खासदार अशोकराव शंकरराव चव्हाण, नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या महापौर मा. सौ. कविता संतोष मुळे, खासदार मा. डॉ. अजित माधवराव गोपछडे, खासदार मा. श्री. रवींद्र वसंतराव चव्हाण, खासदार मा. बळवंत बसवंत वानखेडे, विधान परिषदेचे सदस्य अमरनाथ अनंतराव राजूरकर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री. संजय कुमार श्रीवास्तव, नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री. प्रदीप कामले तसेच इतर रेल्वे अधिकारीही या कार्यक्रमास उपस्थित होते.

उपस्थितांना संबोधित करताना केंद्रीय रेल्वेमंत्री मा. श्री. अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, टनकपूरनांदेड एक्सप्रेसची सुरुवात ही जनतेच्या दीर्घकाळापासूनच्या अपेक्षांची पूर्तता आहे. ही नवीन रेल्वे सेवा उत्तराखंड आणि महाराष्ट्र यांच्यातील रेल्वे संपर्क अधिक मजबूत करेल तसेच नांदेड येथील पवित्र तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वाराला जाणाऱ्या भाविकांसाठी मोठी सुविधा ठरेल. त्यांनी पुढे सांगितले की, नांदेडमुंबई एक्सप्रेसमुळे मराठवाडा परिसरातील, विशेषतः वाशीम, हिंगोली आणि बसमत येथील प्रवाशांना मुंबईशी अधिक सुलभ रेल्वे संपर्क उपलब्ध होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत भारतीय रेल्वेने केलेल्या प्रगतीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, या कालावधीत ३७,००० किलोमीटरहून अधिक नवीन रेल्वेमार्ग टाकण्यात आले असून रेल्वे जाळ्याचे ९९.६ टक्के विद्युतीकरण पूर्ण झाले आहे. बुलेट ट्रेन प्रकल्प तसेच समर्पित मालवाहतूक मार्ग वेगाने प्रगतीपथावर असल्याचे त्यांनी नमूद केले. मध्यमवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना परवडणारा व सुरक्षित प्रवास उपलब्ध करून देण्यासाठी विविध राज्यांमध्ये सातत्याने नवीन रेल्वे सेवा सुरू करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. यावर्षी जून महिन्यापर्यंत उन्हाळी हंगामात १५,००० हून अधिक विशेष गाड्या चालविण्यात आल्या असून, दिवाळी आणि छठ उत्सवादरम्यान सुमारे १२,००० विशेष गाड्या चालविण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री. देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही नवीन रेल्वे सेवांच्या प्रारंभाबद्दल जनतेचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, नांदेडमुंबई एक्सप्रेसमुळे मराठवाड्यातील विशेषतः बसमत, हिंगोली, वाशीम, अकोला आणि नांदेड जिल्ह्यांतील प्रवाशांना मुंबईसाठी थेट आणि सोयीस्कर रेल्वे संपर्क उपलब्ध होईल. तसेच टनकपूरनांदेड एक्सप्रेसमुळे उत्तराखंड व उत्तर प्रदेशातील भाविकांना नांदेड येथील पवित्र सचखंड गुरुद्वाराला जाणे अधिक सुलभ होईल.

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी सांगितले की, टनकपूरनांदेड एक्सप्रेसमुळे श्रद्धा, पर्यटन आणि विकासाला चालना मिळून उत्तराखंड आणि महाराष्ट्र यांच्यातील संबंध अधिक दृढ होतील. ही नवीन रेल्वे सेवा महत्त्वाच्या स्थळांमधील संपर्क अधिक सक्षम करेल, असे त्यांनी नमूद केले.

केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे जनतेच्या अपेक्षा पूर्ण करून या नवीन रेल्वे सेवा सुरू केल्याबद्दल आभार मानले. त्यांनी सांगितले की, टनकपूरनांदेड आणि नांदेडमुंबई एक्सप्रेसमुळे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक संबंध अधिक दृढ होतील तसेच या भागातील जनतेला अधिक चांगली संपर्क सुविधा उपलब्ध होईल.

नांदेड रेल्वे स्थानकावरील कार्यक्रमात खासदार अशोकराव शंकरराव चव्हाण यांनी सांगितले की, या दोन नवीन रेल्वे सेवांमुळे नांदेड आणि मराठवाड्याचा देशातील प्रमुख शहरांशी रेल्वे संपर्क अधिक मजबूत होईल. गेल्या काही वर्षांत लोकांच्या सहकार्यामुळे आणि प्रभावी नेतृत्वामुळे नांदेड परिसरातील रेल्वे पायाभूत सुविधांमध्ये मोठा बदल झाल्याचे त्यांनी नमूद केले.

नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या महापौर सौ. कविता संतोष मुळे यांनी सांगितले की, नांदेडमुंबई एक्सप्रेस विद्यार्थी, भाविक, व्यावसायिक आणि विविध क्षेत्रातील प्रवाशांसाठी विशेषतः लाभदायक ठरेल. या नवीन रेल्वे सेवांमुळे परिसराच्या सामाजिक व आर्थिक विकासालाही चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले.

खासदार डॉ. अजित माधवराव गोपछडे यांनी मा. पंतप्रधान आणि मा. केंद्रीय रेल्वेमंत्र्यांचे नांदेडमुंबई व टनकपूरनांदेड या नवीन एक्सप्रेस गाड्या सुरू केल्याबद्दल आभार मानले. या गाड्यांमुळे नांदेडचा महाराष्ट्रातील तसेच उत्तर भारतातील महत्त्वाच्या शहरांशी संपर्क अधिक सुदृढ होईल, असे त्यांनी सांगितले.

खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी सांगितले की, नांदेडमुंबई आणि नांदेडटनकपूर एक्सप्रेसमुळे नांदेडचा संपर्क आणि पर्यटनाला अधिक चालना मिळेल. नांदेड हे हैदराबाद, मुंबई आणि नागपूर यांना जोडणारे महत्त्वाचे केंद्र असल्याचे सांगून प्रवाशांच्या सोयीसाठी आणखी रेल्वे सेवा सुरू करण्याची त्यांनी मागणी केली.

यापूर्वी दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक संजय कुमार श्रीवास्तव यांनी स्वागतपर भाषण केले.

# अमरावती जिल्ह्यातील मजिप्रा, जलजीवन मिशनच्या कामांना गती द्या- मंत्री गुलाबराव पाटील यांचे निर्देश



**मुंबई/प्रतिनिधी** :अमरावती जिल्ह्यात उन्हाळ्यामध्ये विविध गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. अचलपूर, चांदूरबाजार तालुक्यातील २३ गावांना पाण्याचे स्त्रोत जवळ नसल्याने १५ किमीवरून पाणी आणावे लागते. नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय होण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जल जीवन मिशनमधील प्रलंबित कामांना गती द्यावी, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत मंत्री पाटील बोलत होते. आमदार बच्चू कडू, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सदस्य सचिव अमगोथू रंगानायक, उपसचिव मंत्रा मानकामे, मजिप्राचे अधीक्षक अभियंता अजय सिंह, मजिप्राचे अमरावतीचे अधीक्षक अभियंता संतोष गव्हाणकर, कार्यकारी अभियंता विवेक सोळंके, अमरावती जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंता स्नेहा धावडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी तर अमरावतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे यावेळी उपस्थित होते.

मंत्री पाटील यांनी सांगितले की, चिखलदऱ्याच्या ग्रामीण भागातील ३६ गावांना आजही टँकरने पाणीपुरवठा होतो, ही गंभीर बाब आहे. मजिप्रा, जलजीवन मिशन योजना निधीअभावी रखडू देवू नका. दुर्गम भागातील पाणीपुरवठ्याला प्राधान्य द्या. मेळघाटातील योजना आदिवासी आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेवून जास्तीत जास्त निधी मिळण्यासाठी प्रयत्न करावेत. अचलपूर आणि चांदूरबाजार भागातील काही गावे पादेशिक पाणीपुरवठा योजनांमधून सुटलेली आहेत. गावांच्या मागणीनुसार सद्य:वस्तुस्थितीचे पुन्हा सर्वेक्षण करून १५ दिवसात अहवाल सादर करावा, त्यानंतर त्या गावांचा मजिप्रा योजनेत समावेश करावा, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

अचलपूर तालुक्यातील २४ गावातील जलजीवन मिशनची ८० टक्के; तर चांदूरबाजारमधील कामे ९८ टक्के पूर्ण झाली आहेत. यामधील ८३ गावात पाणीपुरवठा सुरू झाला आहे. मात्र ८ ते १० गावात योजना पूर्ण होवूनही पाण्याचे स्त्रोत उपलब्ध नसल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पाण्याचे स्त्रोत जवळचे शोधण्याऐवजी दूरचे शोधून पाणीपुरवठा करण्याच्या सूचनाही मंत्री पाटील यांनी दिल्या.

मजिप्राच्या योजना त्वरित पूर्ण करून काही गावांचे स्थलांतर थांबवावे. आदिवासी, दुर्गम भाग, व्याघ्र प्रकल्प याबाबतच्या अडचणी समजून केंद्राच्या निधीची वाट न पाहता राज्य शासनाने उपाययोजना करण्याची मागणी आमदार श्री. कडू यांनी केली.

## कोकणात वादळी वाऱ्यासह तुफानी पाऊस; रत्नागिरीत रेल्वे स्थानकाचं छत कोसळले, सिंधुदुर्गात घरांचे मोठे नुकसान

रत्नागिरीसिंधुदुर्ग : मुंबई, कोकणासह पश्चिम महाराष्ट्रात मुसळधार पाऊस सुरू आहे. रविवारी (५ जुलै) रात्रीपासून पावसाचा जोर वाढला असून भारतीय हवामान विभाग (घ्श) ने मुंबई, पुणे आणि कोकण किनारपट्टीसह घाटमाथ्यावर पुढील दोन दिवसांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. अशा स्थितीत नागरिकांनी काळजी घ्यावी, असं आवाहन हवामान विभागानं केलं आहे. रत्नागिरी रेल्वे स्थानकाच्या छताचा भाग कोसळला :कोकण रेल्वे मार्गावरील अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या रत्नागिरी रेल्वे स्थानकावर रविवारी रात्री मोठी दुर्घटना घडली. जोरदार वादळी वाऱ्यामुळे रेल्वे स्थानकावरील मुख्य छताचा एक मोठा भाग अचानक कोसळला. ही घटना रात्रीच्यावेळी घडल्याने मोठा अनर्थ टळला असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री १०:४५ वाजेच्या सुमारास रत्नागिरीत वादळी वाऱ्याला सुरुवात झाली. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की, रेल्वे स्थानकाच्या परिसरातील छताला याचा मोठा फटका बसला आणि काही वेळातच छताचा काही भाग खाली कोसळला. रात्रीची वेळ असल्यानं स्थानक परिसरात प्रवासी, नागरिक आणि वाहनांची वर्दळ अत्यंत कमी होती. त्यामुळे कोणालाही दुखापत झाली नाही आणि जीवितहानी टळली.

# आर्थिक विकास महामंडळाच्या बाबतीत सरकार; कलाल-कलार समाजाची अवहेलना का करीत आहे?

गेल्या पाच वर्षांपासून कलाल-कलार समाजाला न्याय मिळावा यासाठी ''महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना'' सातत्याने सरकार दरबारी संपूर्ण शक्तीनिशी प्रयत्न करीत आहे.परंतु सरकारला अजुनपर्यंत इतर समाजाप्रमाणे कलार-कलाल समाजाच्या प्रती जाग आलेला दिसत नाही ही समाजाच्या प्रती शोकांतिका म्हणावी लागेल.सरकारने आतापर्यंत मराठा समाज, ब्राह्मण समाज, राजपूत समाज, वीरशैव लिंगायत समाज,वडार समाज,गुरव समाज, रामोशी समाज इत्यादी समाजाला सरकारने आर्थिक विकास महामंडळ जाहिर केले आहे.यात काही समाजानी आर्थिक विकास महामंडळाची मागणी किंवा आंदोलन सुध्दा केले नाही अशाही काही समाजाला सुध्दा सरकारने आर्थिक विकास महामंडळ जाहिर केले आणि त्यांचे कार्य सुरू आहे.परंतु गेल्या पाच वर्षांपासून सतत पाठपुरावे आंदोलन, निवेदन देऊन आणि संपर्कात असुन सुद्धा सरकार कलार-कलाल समाजाकडे दुर्लक्ष करीत आहे ही महाराष्ट्र सरकारकडून लोकशाहीची विटंबनाच म्हणावी लागेल. समाजाला न्याय मिळावा यासाठी २०२२ मध्ये नागपूर विधानसभेवर मोर्चा काढण्यात आला होता, यानंतर २०२३ मध्ये पुन्हा नागपूर विधानसभेवर भव्य मोर्चा काढण्यात आला आणि नुकताच ७ आक्टोंबर २०२५ ला मुंबई येथे आझाद मैदानावर मोठे आंदोलन करण्यात आले होते.यादरम्यान सुद्धा संबंधित खात्याचे मंत्री महोदय अतुलजी सावे यांना निवेदन देण्यात आले. याव्यतीरीक्त वेगवेगळ्या मंत्र्यांना व संबंधित मंत्रीमहोदयांना निवेदन देऊन व मेल व्दारे पत्रव्यवहार करून समाजाच्या समस्यांबद्दल अवगत सुध्दा करण्यात आले. मोर्च्यादरम्यान व आंदोलनादरम्यान सरकारला समाजाच्या मागण्यांचे वेळोवेळी निवेदने व पाठपुरावा सुध्दा करण्यात आला.सोबतच संबंधित मंत्री,मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांना आतापर्यंत अनेकदा पाठपुरावा सुध्दा केलेला आहे आणि हा पाठपुरावा समाजाला न्याय देण्यासाठी सरकारजवळ भरपूर आहे असा संघटनेला ठाम विश्वास आहे. त्याचप्रमाणे अनेक वर्तमानपत्रांच्या माध्यमातून कलाल-कलार समाजाच्या समस्या महाराष्ट्र सरकारपुढे पोहचविण्यात आल्या. कारण सत्य परिस्थिती राज्याच्या जनतेपुढे व सरकारपुढे मांडने हे समाजाचे प्रथम कर्तव्य आहे असे समाजाचे ध्येय आहे. आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात संबंधित खात्याचे मंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याशी अनेकदा चर्चा सुध्दा झाल्यात प्रत्येक मंत्री महोदयांनी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचे आम्हाला ठोस आश्वासन सुध्दा दिले. परंतु आता अशी परिस्थिती ''घी काय मे गया तो खिचडी मे'' अशी गंभीर स्थिती सरकारने करून ठेवली आहे. आज चार ते पाच वर्षांचा काळ लोटत आहे तरीही सरकारला समाजाच्या समस्यांबद्दल अजुनपर्यंत जाग आल्याचे दिसत नाही हे महाराष्ट्राचे व लोकशाहीचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. राज्यात असेही अनेक समाज आहे की ज्या समाजाने कोणतेही आंदोलन केले नाही किंवा संघर्ष केला नाही अशाही समाजाला सरकारने आर्थिक विकास महामंडळ जाहीर केले व त्यांचे कार्य सुरू झाले आहे याचेही महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना स्वागत करते. कारण कोणताही समाज असो तो विकासाच्या प्रवाहात यायलाच हवा असे आमचे स्पष्ट ध्येय आहे.महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या अल्पशा मागण्या सरकार दरबारी आहेत आणि त्याबद्दल ठोस पाठपुरावे सुध्दा केले आहेत.याच अनुषंगाने समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी व समाजाच्या युवकांना रोजगार मिळावा व समाजाचा विकास व्हावा यासाठी ''भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ'' स्थापन करण्यात यावे आणि विश्वकर्मा योजने अंतर्गत समाजाचा पारंपरिक मद्य व्यवसाय समाजाला देण्यात यावा इत्यादी समाज हिताच्या मागण्यांच्या संदर्भात सतत संघर्ष व पाठपुरावे सुरूच आहे आणि सुरूच राहील.या पत्राद्वारे सरकारला पुन्हा आश्वस्त करण्यात येते की,समाजाच्या प्रती''महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेचा'' पाठपुरावा, संघर्ष,आंदोलन, वेळोवेळी दिलेले निवेदन, पत्रव्यवहार आणि समाजावर होत असलेला अन्याय या संपूर्ण बाबींचा सरकारने, संबंधित मंत्रीमहोदय, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, प्रशासन यांनी गांभीर्याने विचार करावा व इतर समाजाप्रमाणे कलाल-कलार समाजासाठी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात ठोस निर्णय घेऊन ''भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ'' स्थापन करावे व समाजाला योग्य न्याय मिळवून द्यावा अशी आग्रहाची मागणी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटने मार्फत सरकारला व संबंधित मंत्रीमहोदयांना करण्यात येत आहे. अन्यथा आम्हाला पुन्हा आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल.करीता सरकारला पुन्हा आश्वस्त करण्यात येते समाजाचा अंत न पहाता सरकारने समाजाचे गांभीर्य लक्षात घेऊन समाजाच्या मागण्यांनवर सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात तातडीने ठोस निर्णय घ्यावा व समाजाला विकासाच्या प्रवाहात आणावे.अशी मागणी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने सरकारला करण्यात येत आहे. जय कलार!जय हिंद.

**रमेश लांजेवार**
**( राज्य प्रवक्ता )**
**महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना, मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# पावसाच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणा २४ बाय ७ 'अलर्ट मोड'वर ठेवा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्यातील पावसाच्या परिस्थितीचा मुख्यमंत्र्यांनी मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षातून घेतला आढावा; अत्यावश्यक असल्याशिवाय दोन दिवस नागरिकांनी घराबाहेर पडू नये

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईसह किनारी भागातील जिल्ह्यात वाऱ्याचा ताशी वेग ५० ते ७० किलोमीटर प्रति तास असण्याची शक्यता आहे. यासोबतच आज दुपारी ३ ते ४.३० वाजे दरम्यान समुद्राला भरती येण्याची शक्यताही आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांनी २४ बाय ७ अलर्ट मोडवर राहून आपत्कालीन परिस्थिती आल्यास तातडीने मदत कार्य करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. राज्यभरात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याने आज आणि उद्या अत्यावश्यक काम असल्याशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडू नये , असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.




राज्य आपत्ती नियंत्रण कक्षामध्ये आयोजित बैठकीत राज्यातील पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हवामान विभागाच्या अंदाजानुसार मुंबई आणि किनारी भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस अपेक्षित आहेत. अपेक्षित उच्च भरतीच्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती प्रतिसाद दल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांना 'अलर्ट मोड'वर ठेवण्यात आले आहेत. पुराची परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने 'एसडीआरएफ' आणि 'एनडीआरएफ' ची पथके रवाना करण्यात यावी. आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना तातडीने मदत मिळेल, याची काळजी घ्यावी.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील अडथळे तात्काळ दूर करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याशी समन्वय साधून महामार्गावरील मलबा हटविण्यात यावा. पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन संभाव्य दरड कोसळणाऱ्या ठिकाणी पथके सज्ज ठेवावीत. तसेच मुंबई-गोवा महामार्गावर यावेळी अनपेक्षित ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी सज्ज राहून दरडीचा मलबा तात्काळ हटविण्यात यावा. कुठल्याही परिस्थितीत वाहतुकीचे कोंडी होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

नाशिक व त्रंबकेश्वर परिसरातील पर्यटकांची विशेष खबरदारी घ्यावी

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अरबी समुद्रावर बनत असलेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे नाशिक जिल्ह्याच्या बऱ्याचशा भागात उद्या ढगफुटी सदृश्य पाऊस होण्याची दाट शक्यता आहे.

हा पाऊस बऱ्यापैकी त्र्यंबकेश्वर व आजूबाजूच्या परिसरात पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून सुमारे ३०० मिलिमीटर पाऊस अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत नाशिक जिल्हा प्रशासनाने सज्ज राहून सखल भागात पाणी साचणार नाही, यासाठी उपाययोजना कराव्यात. कुठेही जीवित हानी होणार नाही, याबाबतही दक्ष रहावे.

ही परिस्थिती लक्षात घेता नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात असलेल्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी विशेष खबरदारी घेण्यात यावी. बंद होऊ शकणारे रस्ते, दरडी कोसळण्याची ठिकाणी अशा सर्वंकष बाबींचा विचार करून पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे. पुढील काही दिवस त्र्यंबकेश्वर परिसरामध्ये पर्यटकांनी जावू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

सर्व यंत्रणांनी अत्यंत सतर्क राहून अडकलेल्या नागरिकांच्या सुटकेसाठी तात्काळ कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. पुढील ४८ तास 'शून्य बळी' हे उद्दिष्ट ठेवून कमाल दक्षता बाळगावी, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मुंबई शहरात एका महिन्याच्या सरासरी इतका पाऊस अवघ्या चार दिवसांत नोंदवण्यात आला आहे. विशेषतः भरतीच्या काळात अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर आपत्तीजन्य स्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. यंत्रणांच्या प्रयत्नांमुळे पाणी साचण्याची समस्या मोठ्या प्रमाणात नियंत्रित ठेवण्यात यश आले आहे. काल मुंबई शहरात ताशी ५० किलोमीटर वेगाने वारे वाहताना निदर्शनास आले. यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. साधारणपणे संपूर्ण चार महिन्यांच्या मान्सूनमध्ये जितकी झाडे पडतात, त्यापैकी जवळपास ३०० झाडे एकाच दिवशी पडली आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

येत्या तीन दिवसांत, म्हणजे ८ जुलैच्या रात्रीपर्यंत, हवामानाची तीव्रता कायम राहण्याचा अंदाज आहे. सर्व जिल्हा प्रशासनाने सतर्क रहावे. दरम्यान, भूस्खलनाच्या घटनाही समोर आल्या आहेत. मुंबईपुणे द्रुतगती मार्गावरही मोठ्या प्रमाणावर भूस्खलन होऊन मोठ्या प्रमाणात माती व दगड रस्त्यावर आले आहेत. संबंधित यंत्रणा मार्ग मोकळा करून वाहतूक पूर्ववत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम कराव, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

अशा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी 'वर्क फ्रॉम होम'चा अवलंब करावा. खाजगी आस्थापनांनी मानवतेच्या दृष्टिकोनातून कर्मचाऱ्यांना वर फ्रॉम होम जे सवलत द्यावी असे न करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे विभागीय आयुक्त यांच्याकडून संबंधित विभागाचा आढावा घेतला. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, प्रधान सचिव (नगरविकास) के. एच. गोविंदराज, प्रधान सचिव (जलसंपदा) एकनाथ डवले,मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सचिव (आरोग्य) ई. रविंद्रन, संचालक श्री. चव्हाण आदी उपस्थित होते.

थोडक्यात पावसाची माहिती

आज ६ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत मुंबई उपनगर जिल्ह्यात १५१.२ मिलिमीटर पाऊस झाला असून मुंबई शहरामध्ये १०५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

रायगड जिल्ह्यात २३६.६, ठाणे जिल्ह्यात १५८.७ रत्नागिरीमध्ये १५२.३ पावसाची नोंद झाली आहे.

## अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजनेच्या सक्षमतेसाठी प्रलंबित चौकशी प्रकरणे तातडीने निकाली काढा - केंद्रीय उपसचिव सुदीप दत्ता

**मुंबई/प्रतिनिधी :** २०२२ मध्ये शिष्यवृत्ती योजनांतील निधीच्या गैरवापराच्या प्रकरणांनंतर ८३० शैक्षणिक संस्थांची प्रकरणे केंद्रीय अन्वेषण विभागाकडे आणि ६० हजारांहून अधिक प्रकरणे विविध राज्यांकडे चौकशीसाठी सोपविण्यात आली आहेत. ही प्रकरणे निकाली निघाल्याशिवाय योजना पूर्ण क्षमतेने पुन्हा सुरू करणे शक्य होणार नाही. त्यामुळे राज्यांनी चौकशी प्रक्रियेला गती देऊन प्रलंबित प्रकरणांची चौकशी तातडीने करण्याचे निर्देश केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाचे उपसचिव (शष्यवृत्ती)सुदीप दत्ता यांनी दिले.

केंद्र शासनाच्या पूर्व-माध्यमिक, उत्तर-माध्यमिक आणि गुणवत्ता व साधनआधारित शिष्यवृत्ती योजनांबाबत प्रलंबित चौकशी प्रकरणांचा आढावा घेऊन योजनांची प्रभावी अंमलबजावणी पुन्हा सुरू करण्याच्या उद्देशाने अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने सचिवालय जिमखाना, मुंबई येथे महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश आणि दादरा व नगर हवेली व दीव दमण या पाच राज्यांची प्रादेशिक कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

कार्यशाळेत महाराष्ट्र, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांतील वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले. अल्पसंख्याक विकास विभागाच्या सचिव डॉ. माधवी खोडे चवरे यावेळी उपस्थित होत्या.

उपसचिव सुदीप दत्ता म्हणाले राज्यांकडून झालेल्या प्रगतीचा आढावा घेऊन चौकशीदरम्यान येणाऱ्या अडचणी, तपास यंत्रणांसमोरील समस्या आणि त्यावरील उपाययोजनांवर कार्यशाळेत सविस्तर चर्चा करण्यात आली असून प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यक समन्वय साधून त्यानंतर वित्त मंत्रालय, खर्च विभाग, मंत्रिमंडळ सचिवालय आणि पंतप्रधान कार्यालयाकडे शिष्यवृत्ती योजना पुन्हा सुरू करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी राज्यांना ३१ जुलैपर्यंत गैरवापर झालेल्या निधीच्या वसुलीसाठी प्रभावी प्रयत्न करण्याचे, आवश्यकतेनुसार बँकांची मदत घेण्याचे, वसुली न झाल्यास एफआयआर नोंदविण्याची प्रक्रिया राबविण्याचे, तसेच १ ते १५ ऑगस्टदरम्यान क्लोजर रिपोर्ट सादर करण्याचे निर्देश दिले. या मुदतीत प्रकरणांचा निपटारा झाल्यास शिष्यवृत्ती योजना पुन्हा सुरू करण्याच्या प्रक्रियेला गती मिळेल, असे त्यांनी सांगितले.१५ ऑगस्टपर्यंत आवश्यक उद्दिष्टे पूर्ण करून शिष्यवृत्ती योजना पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्र व राज्यांनी समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन त्यांनीकेले.

सचिव डॉ. माधवी खोडे चवरे म्हणाल्या, अल्पसंख्याक समाजाचा विकास हा सकारात्मक दृष्टिकोनातून आणि परिणामकारक अंमलबजावणीतून साध्य होणार आहे.

कोणत्याही अडचणींवर मात करून अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी सातत्याने कार्य करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. विविध राज्यांचे अनुभव आणि सूचना लक्षात घेऊन शिष्यवृत्ती योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नव्याने सुरुवात करण्याची ही संधी असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमासाठी महाराष्ट्राची निवड झाल्याबद्दल त्यांनी भारत सरकारचे आभार मानले.

कार्यशाळेत चौकशी प्रकरणांच्या अंतिम निपटाऱ्यासाठी विभागांमधील प्रभावी समन्वयाचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले. विशेषतः महाराष्ट्रात अल्पसंख्याक विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच गृह विभाग यांच्या समन्वयातून प्रकरणांवर अंतिम कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले. संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करून शिष्यवृत्ती योजना पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही गतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी श्री दत्ता यांनी अल्पसंख्याक कार्य मंत्रालय आणि महाराष्ट्र शासनाचे कार्यशाळेच्यायशस्वी आयोजनाबद्दल अभिनंदन केले.

## संभाव्य पूरस्थितीवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासन सतर्क आणि सज्ज - जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष

**सांगली/प्रतिनिधी :**हवामान खात्याच्या पावसाच्या इशाऱ्याच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने अत्यावश्यक सर्व पूर्वतयारी पूर्ण केली आहे. संबंधित सर्व यंत्रणा सतर्क असून, संभाव्य पूर परिस्थितीवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी आज दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील पूरप्रवण व पूरबाधित जिल्ह्यांच्या सज्जतेचा आढावा मुंबईतून दूरदृष्यप्रणालीद्वारे घेतला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी जिल्ह्यातील पर्जन्यमान, कृष्णा व वारणा नद्यांची वाढती पाणीपातळी, बचाव व मदतकार्याची तयारी, स्थलांतराचे नियोजन तसेच विविध विभागांनी केलेल्या पूर्वतयारीची माहिती सादर केली.

सांगली जिल्ह्यात आज रोजी आपत्तीप्रवण स्थिती नाही, असे सांगून जिल्हाधिकारी डॉ. घोष म्हणाले, आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने रंगीत तालीम घेऊन नागरिकांना माहिती देण्यात आली आहे. सांगली जिल्ह्यात राष्ट्रीय आपत्ती निवारण प्राधिकरणचे एक पथक १ जुलै रोजी दाखल झाले आहे. हे पथक संभाव्य पूरस्थितीच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी करत आहे. आपत्ती निवारणाच्या अनुषंगाने पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक ती सर्व पूर्वतयारी केली असून वेळोवेळी आवश्यकतेनुसार आढावा घेतला जात आहे. संबंधित सर्व यंत्रणा परस्पर समन्वय राखून आहेत, असे त्यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीस जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथून जिल्हाधिकारी यांच्यासह निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे, तहसीलदार लीना खरात, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी रफिक नदाफ तसेच, पोलीस अधीक्षक तुषार दोशी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

सांगली जिल्ह्याची आजची स्थिती अशी

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार आगामी पाच दिवसात सांगली जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता कमी असून, जिल्हा ग्रीन झोन मध्ये आहे. परंतु सातारा व कोल्हापूर जिल्ह्यात होणाऱ्या पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेऊन आहे. सांगली विभागाचे आजचे सरासरी पर्जन्यमान १४.६ मि. मी. आहे. आयर्विन पुलाची इशारा पातळी ४० फूट व धोका पातळी ४५ फूट आहे. आज रोजी आयर्विन पुलाची पाणीपातळी १२.६ फ ूट आहे. सद्यस्थितीत वारणा धरण ४२ टक्के भरले आहे. धरणाची क्षमता ३४.४० टी. एम. सी. असून आज रोजी धरणात १४.५९ टी. एम. सी पाणीसाठा आहे. सांगली जिल्ह्यात दि. ६ जुलै रोजी कृष्णा नदीवरील पाण्याखाली तीन बंधारे असून, त्यामध्ये बहे (ता. वाळवा), सांगली (ता. मिरज), म्हैशाळ (ता. मिरज) यांचा समावेश आहे. सांगली जिल्ह्यात जास्तीचा पाऊस शिराळा तालुक्यात पडला असून, मांगले सावर्डे पुलावर पाणी आल्याने, त्या रस्त्यावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. पर्यायी रस्ता म्हणून मांगले काखे पुलावरून वाहतूक सुरू आहे. या रस्त्याचा वाहतुकीसाठी वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



## सिंधुदुर्ग जिल्ह्याला वादळी वाऱ्यासह पावसाने झोडपले; ऑरेंज अलर्ट जारी

सिंधुदुर्ग : अरबी समुद्रात निर्माण झालेल्या अनुकूल हवामानामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात शनिवारपासून मुसळधार पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. अवघ्या २४ तासांत जिल्ह्यात सरासरी ९५.१२ मिमी पावसाची नोंद झाली असून, कणकवली तालुक्यात सर्वाधिक १८० मिमी पाऊस कोसळला आहे. वादळी वाऱ्यांसह झालेल्या संततधार पावसामुळे नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत. अनेक ठिकाणी घरे, गोठ्यांची पडझड होऊन लाखो रुपयांची हानी झाली आहे. झाडे उन्मळून पडली असून, वाहतुकीवर परिणाम झाला आहे. हवामान विभागाने पुढील ४८ तासांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केल्याने जिल्हा प्रशासनानेही नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन केलेय. वादळी वाऱ्यामुळे जिल्ह्यात अनेक ठिकाणी घरे, गोठे, मांगर, शेडचे नुकसान झाले असून, अनेकांच्या छपरावरील पत्रे वाऱ्याने उडालेत. लाखो रुपयांची हानी झाली आहे. मुख्य रस्ते आणि राष्ट्रीय म हामार्गावर झाडे कोसळल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. सखल भागातील पुलांवरून पाणी वाहू लागल्याने काही गावांचा संपर्क तुटला असून, प्रशासनाकडून रस्ते मोकळे करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

नद्यांच्या पाणी पातळीत वेगाने वाढ : सावंतवाडी तालुक्यातील सांगेली येथील विष्णू सोमा राऊळ यांच्या घरावर रविवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास वादळाम ुळे फणसाचे मोठे झाड कोसळून सुमारे सहा लाखांचे नुकसान झाले. घटनास्थळी तहसीलदार श्रीधर पाटील यांच्यासह महसूलच्या पथकाने मदतकार्य केले. तर कुडाळ तालुक्यातील आकेरी दांड्याचे गाळू येथे वटवृक्ष इमारतीवर कोसळला. यात अन्य झाडेही पडून त्याखाली दोन कार, दुचाकी सापडून मोठी हानी झाली. नद्यांच्या पाणी पातळीत वेगाने वाढ होत असल्याने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. काही धरणेही पूर्ण क्षमतेने भरली असल्याने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात येणार आहे. त्याम ुळे धरण परिसरातील गावांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन केलेय.



## आपत्कालीन परिस्थितीत हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करण्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात उद्भवलेल्या संभाव्य पूरपरिस्थिती आणि मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला पूर्णपणे सतर्क राहण्याचे आणि प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

राज्यात कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना तातडीने मदत मिळावी, यासाठी राज्य सरकारची संपूर्ण यंत्रणा सज्ज असून २४ तास कार्यरत असणारे नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूत्रांकडून येणाऱ्या माहितीचा आधार घ्यावा आणि संकटसमयी जाहीर केलेल्या अधिकृत हेल्पलाईन क्रमांकांवर त्वरित संपर्क साधावा, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.




राज्यस्तरीय मुख्य नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी १०७० हा टोल-फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून, नागरिक ०९३२१५८७१४३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा ०२२-२२०२७९९० आणि ०२२-२२७९४२२९ या दूरध्वनी क्रमांकांवर देखील थेट संपर्क साधू शकतात. याशिवाय, प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थानिक पातळीवर जलद गतीने मदत कार्य राबवण्यासाठी आणि परिस्थितीवर तात्काळ नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षही सज्ज ठेवण्यात आले आहेत, ज्यांचा मुख्य संपर्क क्रमांक १०७७ असा आहे, असेही आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या संवेदनशील क्षेत्रांतील नागरिकांच्या सुरक्षिततेची योग्य ती काळजी घेण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी नागरिकांनी अजिबात न घाबरता या जाहीर केलेल्या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधून प्रशासकीय यंत्रणेची मदत घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

## आळंदी व देहू येथे येणाऱ्या वारकऱ्यांनी पुण्यातच वारीमध्ये सहभागी व्हावे; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**मुंबई /प्रतिनिधी :** इंद्रायणी नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला असून आळंदी शहरात प्रवेश करणारे नदीवरील चारही पूल पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे सध्या आळंदी शहरात येणे सुरक्षित नाही. ज्या वारकरी व भाविकांनी आळंदीच्या दिशेने प्रवास सुरू केला आहे, त्यांनी ज्या ठिकाणी आहात, त्या ठिकाणीच सुरक्षित थांबावे. देहू व आळंदी येथे न जाता पुणे शहरात वारीमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, प्रशासन, पोलीस यंत्रणा व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच नदीपात्र, घाट परिसर व बंद करण्यात आलेल्या पुलांकडे जाणे टाळावे. आपल्या सुरक्षिततेसाठी प्रशासन आवश्यक ती सर्व उपाययोजना करत आहे. सर्वांनी संयम बाळगून प्रशासनाला सहकार्य करावे. काही वारकरी बांधव पुणे शहरापर्यंत आले असल्यास त्यांनी पुणे शहरातच थांबावे, असेही आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

## १२ तासांनंतर खवटीतील दरड हटली; मुंबई-गोवा महामार्गावर एकेरी वाहतूक सुरू

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील खवटी येथे मुंबई-गोवा महामार्गावर रविवारी पहाटे कोसळलेल्या दरडीचा मलबा सुमारे १२ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर एका मार्गिकेवरून हटविण्यात यश आले. त्यानंतर महामार्गावर एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली असून दोन्ही बाजूंना अडकून पडलेली वाहने टप्प्याटप्प्याने सोडण्यात येत आहेत.

रात्री अडीचच्या सुमारास मोठी दरड महामार्गावर कोसळल्याने मुंबई-गोवा महामार्गावरील दोन्ही मार्गिकांवरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. त्यामुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना शेकडो वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. प्रवाशांना तब्बल १२ तास महामार्गावरच अडकून राहावे लागले.

घटनेनंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रशासन, पोलीस तसेच यंत्रसामग्रीच्या मदतीने दरड हटविण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले. सततच्या प्रयत्नांनंतर एका मार्गिकेवरील मलबा हटविण्यात यश आल्याने दुपारनंतर एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली. त्यानंतर अडकून पडलेली वाहने नियोजनबद्ध पद्धतीने मार्गस्थ केली जात आहेत. दरम्यान, दुसऱ्या मार्गिकेवरील दरडीचा मलबा हटविण्याचे काम अद्याप सुरू असून महामार्ग पूर्णपणे वाहतुकीसाठी खुला करण्यासाठी यंत्रणा प्रयत्नशील आहे. नागरिकांनी आवश्यकतेशिवाय या मार्गावर प्रवास टाळावा आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## स्वर्गीय बाबा शिंगोटे यांचे वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजसेवेचे कार्य - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** स्वर्गीय मुरलीधर उपाख्य बाबा शिंगोटे सामान्य कुटुंबातून मेहनतीच्या जोरावर मोठा व्यवसाय उभारला. वृत्तपत्र विक्रीपासून ते अग्रणी वृत्तपत्र समूहाचे संस्थापक हा त्यांचा प्रवास थक्क करणार आहे बाबा शिंगोटे यांनी नेहमी वृत्तपत्राच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न सोडवत समाजसेवेचे कार्य केल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे काढले.लालबाग येथील नारायण उद्योग भवन जवळील चौकाचे 'मुरलीधर उपाख्य बाबा शिंगोटे' असे नामकरण करण्यात आले.

या नवीन चौक नामफलकाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, महापौर रितू तावडे, पुण्यनगरी समूहाचे संचालक अरविंद शिंगोटे, प्रवीण शिंगोटे, भावेश शिंगोटे, प्रतीक शिंगोटे, राजकीय संपादक उदय तानपाठक, संपादक शैलेंद्र शिर्के आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, बाबा शिंगोटे यांनी वृत्तपत्र सृष्टीत मोठे विश्व निर्माण केले आहे. त्यांची दुसरी व तिसरी पिढी आपल्याला काम करताना या ठिकाणी पाहायला मिळत आहे. व्यवसाय कितीही मोठा झाला असला, तरी बाबा शिंगोटे नेहमी आपले साधेपणाला धरून राहिले. कधीही मोठेपणा दाखवला नाही. हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या चौकाच्या नामकरणातून अशा प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाची नेहमी आठवण आपल्या मनात कायम राहील.

## पूरस्थितीमुळे आळंदीत प्रवेश बंद; वारकरी व भाविकांना सुरक्षित ठिकाणी थांबण्याचे आवाहन

**पुणे/प्रतिनिधी :** आषाढी वारी २०२६ च्या पार्श्वभूमीवर इंद्रायणी नदीला आलेल्या मोठ्या पुरामुळे आळंदी शहरात गंभीर पूरस्थिती निर्माण झाली आहे. नदीच्या पाण्याची पातळी धोक्याच्या वर गेल्याने शहरात प्रवेश करणारे अनेक रस्ते पाण्याखाली गेले असून वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने वारकरी, भाविक आणि नागरिकांना सध्या आळंदीत येऊ नये, असे स्पष्ट आवाहन केले आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्यासाठी लाखो भाविक आळंदीत दाखल होतात. मात्र यंदा मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. आधीच आळंदीकडे प्रवास सुरू केलेल्या वारकऱ्यांनी जिथे आहेत तिथेच सुरक्षित थांबावे आणि प्रशासनाच्या पुढील सूचनांची प्रतीक्षा करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. नदीपात्र, घाट परिसर तसेच बंद करण्यात आलेल्या पुलांकडे जाणे टाळावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पोलीस, महसूल विभाग, आपत्ती व्यवस्थापन पथके आणि स्थानिक प्रशासन सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. आवश्यक त्या ठिकाणी बचाव आणि मदतकार्य सुरू असून नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे. अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत माहितीवरच अवलंबून राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सर्वांनी संयम राखून प्रशासनाला सहकार्य करावे, सुरक्षिततेचे नियम पाळावेत आणि परिस्थिती सामान्य होईपर्यंत अनावश्यक प्रवास टाळावा, असे श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान समिती व आळंदी नगर परिषदेने म्हटले आहे.

# लातूर तालुक्यात विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम सुरू

## मतदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदारयादी अद्ययावत करण्याची मोहीम लातूर जिल्ह्यात सुरू करण्यात आली आहे. या विशेष मोहिमेअंतर्गत सन २००२ च्या मतदार यादीशी सर्व मतदारांचे मॅपिंग म्हणजेच पडताळणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या मतदारांचे मॅपिंग होणार नाही, त्यांना पुढील काळात मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसमोर सुनावणीच्या प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे. ही संभाव्य प्रक्रिया टाळण्यासाठी मतदारांनी तातडीने आपले मतदार मॅपिंग करून घ्यावे, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

या मोहिमेसाठी लातूर तालुक्यातील सर्व मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व पर्यवेक्षक यांना मतदारांचे मॅपिंग करणे, अस्पष्ट फोटो गोळा करून ते अद्ययावत करणे आणि डीएसई नोंदींची पडताळणी करणे या कामांसाठी ०१ जुलै २०२६ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत पूर्णवेळ कार्यमुक्त करण्यात आले आहे. हे अधिकारी या कालावधीत मतदारांच्या घरोघरी भेट देऊन माहिती संकलन, ईएफ वाटप व जमा करणे आणि डिजिटायझेशनचे काम ३० जून २०२६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत पूर्ण करणार आहेत. या मोहिमेच्या वेळापत्रकानुसार २० जून ते २९ जून २०२६ दरम्यान बीएलओंचे प्रशिक्षण व मतदारयादी छपाईचे काम पूर्ण झाले असून, घरोघरी जाऊन माहिती संकलन केल्यानंतर ०५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध केली जाईल, ज्यामध्ये केवळ गणना प्रपत्र भरलेल्या व डिजिटायझेशन झालेल्या मतदारांचीच नावे समाविष्ट असतील.

यानंतर ०५ ऑगस्ट ते ०४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मतदारांना दावे व हरकती दाखल करता येतील, ज्यामध्ये नवीन मतदार नोंदणीसाठी फॉर्म नंबर ६, नाव वगळण्यासाठी फॉर्म नंबर ७ आणि दुरुस्तीसाठी फॉर्म नंबर ८ भरण्याची संधी उपलब्ध असेल. या कालावधीत प्राप्त झालेल्या हरकती, अनमॅप्ड मतदार आणि नावात विसंगती असलेल्या मतदारांबाबतच्या सुनावणीचा व दावे-हरकती निकाली काढण्याचा कालावधी ०५ ऑगस्ट ते ०३ ऑक्टोबर २०२६ असा असेल. ०७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदारयादी नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली जाईल.

सुनावणीच्या वेळेस जन्मदाखला, पासपोर्ट, जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक प्रमाणपत्र, कुटुंब नोंदवहीची प्रत, सरकारी जमीन किंवा घराचे दस्तऐवज, सरकारी ओळखपत्र, वन हक्क प्रमाणपत्र, राष्ट्रीय नागरिक नोंदणी किंवा १ जुलै १९८७ पूर्वी सरकारी संस्था, बँक, पोस्ट अथवा एलआयसीने दिलेले ओळखपत्र या ११ मान्यताप्राप्त कागदपत्रांपैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे.



या कार्यक्रमांतर्गत वयोगटानुसार मॅपिंगचे नियम ठरवून देण्यात आले असून, सन २००२ च्या यादीत नाव असलेल्या मतदारांना केवळ मॅपिंग पूर्ण करावे लागेल आणि त्यांना अतिरिक्त कागदपत्रांची गरज भासणार नाही. १ जुलै १९८७ पूर्वी जन्मलेल्या परंतु यादीत नाव नसलेल्या मतदारांना जन्मतारीख व जन्मस्थळ सिद्ध करणारे ११ पैकी एक कागदपत्र द्यावे लागेल; तर १ जुलै १९८७ ते २ डिसेंबर २००४ दरम्यान जन्मलेल्या मतदारांना स्वतःच्या दाखल्यासोबत आई किंवा वडिलांपैकी एकाचे जन्मतारीख व जन्मस्थळ सिद्ध करणारे कागदपत्र सादर करावे लागेल. तसेच २ डिसेंबर २००४ नंतर जन्मलेल्या मतदारांना स्वतःच्या पुराव्यांसह आई आणि वडील या दोघांचेही जन्मतारीख व जन्मस्थळ सिद्ध करणारे दस्तऐवज देणे बंधनकारक राहील. ज्यांचे २००२ च्या मतदार यादीत नाव नसेल किंवा त्यानंतर नाव नोंदणी झाली असेल, त्यांची पडताळणी आई-वडील तसेच आजी-आजोबांच्या नावाच्या आधारे केली जाणार आहे.

माहिती संकलनासाठी बीएलओ मतदारांच्या घरी तीन वेळा भेट देतील आणि मतदार घरी उपलब्ध न मिळाल्यास त्यांच्या घराबाहेर नोटीस चिकटवली जाईल. तीनही भेटींनंतरही संपर्क न झाल्यास संबंधित मतदाराला फॉर्म भरण्याची संधी मिळणार नाही आणि जे मतदार ही प्रक्रिया पूर्ण करणार नाहीत, त्यांना मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षण मोहिमेच्या वेळी सुनावणी व पुराव्यांच्या पडताळणीनंतरच मतदार यादीत नाव समाविष्ट करता येईल, त्यामुळे सर्व मत दारांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# केशवराज शैक्षणिक संकुलात शिक्षणासोबतच आदर्श नागरिक घडविण्याचे काम केले जाते - उद्धव फड




**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज शैक्षणिक संकुलात शिक्षणासोबतच आदर्श नागरिक घडविण्याचे,राष्ट्र भावना निर्माण करण्याचे काम केले जाते, असे प्रतिपादन प्रेरणादायी वक्ते उद्धव फड यांनी केले.अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री केशवराज शैक्षणिक संकुलातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याच्या पहिल्या सत्रात शिष्यवृत्ती परीक्षा, तसेच राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उद्धव फड आपले विचार व्यक्त करत होते.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री केशवराज शैक्षणिक संकुल स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर हे होते. यावेळी मंचावर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, विष्णू सोनवणे, केंद्रीय विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे, स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शालेय समितीचे अध्यक्ष (माध्य.) गंगाधर खेडकर, मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, शिवाजी हेंडगे, प्राचार्या सोनाली दर्डा, शिशुवाटिका प्रधानाचार्या अवंती कुलकर्णी आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना उद्धव फड यांनी साने गुरुजींच्या स्वप्नातील विश्वात शोभून दिसणारा भारत विद्यार्थ्यांवरील संस्कारातून निर्माण होईल. विद्यार्थ्यांचा हा सन्मान केवळ गुणांचा नसून त्यांच्यातील सातत्य, जिद्दीचा आहे. या यशात पालकांचा मोठा त्याग आणि शिक्षकांचे मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे असते. विद्यार्थ्यांच्या डोळ्यात पालकांना त्याचे भविष्य दिसत असते. लातूरचा पालक जागरूक असल्याचे सांगून फड यांनी शिस्तीतून देश उभारत असतो. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेत शिस्तीला महत्त्व दिले जाते,असेही सांगितले.पालकांची अपेक्षा आपला पाल्य केवळ यशापुरता मर्यादित न राहता तो संघर्षात टिकावा अशी असावी.यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी संघर्ष करणाऱ्यांची चरित्रे वाचावीत असे सांगून ही शाळा पालकांच्या विश्वासार्हतेला तडा न जाऊ देणारी असल्याचे नमूद केले. अध्यक्षीय समारोपात धनंजय तुंगीकर यांनी विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी व्हावे, सन्मानाने जीवन जगावे ही प्रत्येकाची भावना असते. आपल्या विद्यालयात संस्कार चांगले होत असल्याने पालक केशवराजला प्राधान्य देतात, असे सांगितले. चांगल्या विद्यार्थ्यांमुळे परिवार, समाज आणि राष्ट्राचेही कल्याण होते असे सांगून त्यांनी गुणवंत विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक श्री केशवराज प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे यांनी केले.कु. अपूर्वा पाटील हिने वैयक्तिक पद्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वैशाली फुलसे यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती रेखा पुरी यांनी केले. कांचन तोडकर यांच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन प्रयागराज गरुड यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, धनंजय कुलकर्णी,राम जोशी, गुरूनाथ झुंजारे, कार्यक्रम प्रमुख मोरेश्वर देशपांडे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## लोकशाही दिनाला अधिकाऱ्यांची अनुपस्थिती; जिल्हाधिकारी व मनपा आयुक्तांनी स्वतः उपस्थित राहावे - नागरिकांची मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** लोकशाही दिन हा सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी व समस्या जलदगतीने आणि न्याय्य पद्धतीने सोडविण्यासाठी शासनाने सुरू केलेला महत्त्वाचा उपक्रम आहे. मात्र, लातूर येथे आयोजित होणाऱ्या लोकशाही दिनामध्ये अनेकदा जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त स्वतः उपस्थित राहत नसल्याचे दिसून येत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

नागरिक आपल्या विभागात वारंवार पाठपुरावा करूनही कामे न झाल्याने अखेर लोकशाही दिनात अर्ज सादर करतात. परंतु, त्या ठिकाणी संबंधित विभागप्रमुख किंवा वरिष्ठ अधिकारी अनुपस्थित राहून त्यांच्या प्रतिनिधींमार्फत सुनावणी घेतली जाते. त्यामुळे नागरिकांना अपेक्षित निर्णय मिळत नाही आणि लोकशाही दिनाच्या उद्देशालाच बाधा येत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

तसेच, अर्ज स्वीकारल्यानंतर अनेकदा टोकन क्रमांक किंवा पोहोच पावती दिली जात नसल्याने अर्जाच्या पुढील कार्यवाहीबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होतो. त्यामुळे लोकशाही दिन हा प्रभावी लोकाभिमुख उपक्रम ठरण्याऐवजी केवळ औपचारिकता राहिल्याचा अनुभव नागरिकांना येत आहे.

यामुळे जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी लोकशाही दिनाच्या दिवशी स्वतः उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी ऐकाव्यात, संबंधित विभागप्रमुखांनाही उपस्थित राहण्याचे निर्देश द्यावेत तसेच अर्जाची टोकन व पोहोच पावती देण्याची सक्ती करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुनिल मंदाडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

त्यांनी पुढे म्हटले आहे की, लोकशाही दिन हा प्रशासन आणि नागरिक यांच्यातील विश्वास दृढ करणारा महत्त्वाचा उपक्रम असून त्याचे गांभीर्य आणि प्रभाव कायम राहण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती अत्यावश्यक आहे.

# प्लास्टिक कॅरीबॅगमुळे पर्यावरण धोक्यात; कापडी पिशवी वापरण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक प्लास्टिकमुक्त दिनानिमित्त लायन्स क्लब ऑफ लातूर सिटी व ''आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी'' या सामाजिक उपक्रमाच्या संयुक्त विद्यमाने दयानंद महाविद्यालय गेट परिसरात नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करून प्लास्टिकमुक्तीबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी प्लास्टिक कॅरीबॅगच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरणासह मानवी आरोग्य आणि पशुपक्ष्यांवर होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती नागरिकांना देण्यात आली. प्लास्टिकच्या पिशव्या सहज विघटन होत नसल्याने त्या अनेक वर्षे जमिनीत आणि नाल्यांमध्ये साचून राहतात. त्यामुळे मातीची सुपीकता कमी होते,



नाले तुंबून पूरस्थिती निर्माण होते, तसेच जनावरे प्लास्टिक खाल्ल्याने त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. प्लास्टिक जाळल्याने विषारी वायू तयार होऊन वायू प्रदूषण वाढते आणि त्याचा मानवी आरोग्यावरही गंभीर परिणाम होतो, असे यावेळी सांगण्यात आले.

या कार्यक्रमास महानगरपालिका अधिकारी श्री. समाधान सुरवंशी, डॉ. अजय नारायणकर (रीजन चेअरमन, लायन्स), श्री. अशोक पांचाळ (डीसी, लायन्स क्रेस्ट), श्री. सौरभ सुतार (अध्यक्ष, लायन्स क्लब लातूर हेल्पिंग हँड्स), लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीचे अध्यक्ष अनिलजी जवर, सचिव ईश्वरजी चांडक तसेच ''आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी'' या सामाजिक उपक्रमाचे अध्यक्ष संजय राजुळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

उपस्थित मान्यवरांनी प्रत्येक नागरिकाने प्लास्टिक कॅरीबॅगचा वापर पूर्णपणे बंद करून कापडी पिशवीचा नियमित वापर करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, छोट्या-छोट्या सवयींमधील बदलातून स्वच्छ, सुंदर आणि प्लास्टिकमुक्त भारत घडविणे शक्य असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ''प्लास्टिकला नकार कापडी पिशवीचा स्वीकार'' हा संदेश देत पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. ''आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी'' या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून भविष्यातही पर्यावरण संरक्षण व जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.